सोमवार दि.३० सप्टेंबर२०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : २८
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in

# आरोपी गोळीबार करतो, पोलिसांनी बंदूक शोकेसमध्ये ठेवायची का?

## एकनाथ शिंदे यांचा महाविकास आघाडीला टोला

### योजनेत खोडा घालणाऱ्यांना बहिणीच जोडा दाखवतील



■ लोकनेता न्यूज नेटवर्क पुणे (वृत्तसंस्था)

विरोधकांना दोन्ही बाजूंनी बोलायची सवयच आहे. बदलापूर प्रकरणात आधी म्हणत होते. आरोपीला भरचौकात फाशी द्या. आता आरोपीने पोलिसांवरच गोळीबार केला तर पोलिसांनी बंदूकी शोकेसमध्ये ठेवायच्या का, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुणे मेट्रोच्या उद्घाटन प्रसंगी मविआला लगावला आहे.सीएम एकनाथ शिंदे म्हणाले की, पुणे मेट्रोचा कार्यक्रम खरेतर गुरुवारी होणार होता. परंतू पावसामुळे उद्घाटन होऊ शकले नाही. सर्वकाही तयारी होती. परंतू लोकांना त्रास होईल म्हणून पंतप्रधानांनी स्वत: हा कार्यक्रम पुढे ढकलण्याची विनंती केली.परंतू विरोधक दोन्ही बाजूंनी बोलतात. आम्ही करतो उद्घाटन असे विरोधक बोलू लागले. दोन्ही बाजूंनी बोलतो चालतो त्याला काय म्हणतात? असा सवाल करत विरोधकांवर निशाणा साधला आहे.

एकनाथ शिंदे म्हणाले की, बदलापूर प्रकरण घडल्यानंतर आरोपीला फाशी द्या, असं विरोधक म्हणत होते. त्यानंतर आरोपी जेव्हा गोळीबार करतो तेव्हा पोलिसांनी बंदूक शोकेसमध्ये ठेवायची का? पोलिसांनी समजा ते केलं नसतं तर विरोधकच म्हणाले असते की चार लोक असून आरोपी गोळीबार करून पळून गेला. मग पोलिसांची बंदूक काय शोसाठी ठेवली का? म्हणजे विरोधक इकडून पण बोलतात आणि तिकडूनही बोलतात



### योजनेत खोडा घालणाऱ्यांना बहिणीच जोडा दाखवतील

एकनाथ शिंदे म्हणाले की, लाडक्या बहीण योजनेत खोडा घालणाऱ्यांना बहिणी जोडा दाखवतील. या योजनेचा राज्यातील लाडक्या बहिणींच्या कुटुंबांना हातभार लागणार आहे. लाडक्या बहिणींच्या संसाराला हातभार लावण्यासाठीची ही योजना आहे. ही योजना बंद होणार नाही म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या योजनांना विरोध करणाऱ्यांवर टीकास्त्र डागले.

### उस्माननगर येथील ग्रामविकास अधिकारी सौ.शिंदे यांच्या

# भ्रष्टाचाराच्या चौकशीची शेकापचे जिल्हाध्यक्ष ईसादकर यांची मागणी

## पत्नीने पतीच्या संगनमताने बोगस कामे करून निधी हाडपला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । वृत्तसंस्था

कंधार तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत म्हणून उस्माननगर येथील ग्रामपंचायत येथे अनेक वर्षांपासून वास्तव करून बसलेल्या महीला ग्रामविकास अधिकारी सौ. डि.ए. शिंदे - माने यांच्या कार्यकाळातील केलेल्या भ्रष्टाचारी कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशी मागणी भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी ईसादकर यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड व अन्य वरिष्ठ अधिकारी यांच्या कडे निवेदनाव्दारे केली आहे.

उस्माननगर येथे मागील अनेक वर्षांपासून गावात वेळेवर नाली सफाई नाही, सरकारी दवाखान्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर दुर्गंधी पसरली आहे. जागोजागी कचऱ्याचे ढीग साचलेले असल्याने दुर्गंधी येत आहे. शासन यावर लाखो रुपये खर्च करीत असते पण येथे मात्र स्वच्छतेला निधी उपलब्ध नसल्याचे सांगून आलेला निधी जातो कुठे की ?

उस्माननगर ता.कंधार येथील गेल्या पाच ते सहा वर्षांपासून सौ .डि . ए. शिंदे - माने या ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शासनाच्या कोट्यवधींच्या निधीचे कामे त्यांचे गुत्तेदार पती ( मिस्टर ) माने हे १५ ( पंधरा) वित्त आयोगाच्या व शासनाच्या ईतर निधीचे कामे त्यांचे गुत्तेदार पती करत असतात. गेल्या पाच सहा वर्षांपासून शासनाची व गावाला लुटून कोट्यवधी रुपयांची निधी हाडफ करण्यात धन्यता मानली आहे.

गावातील मुलभूत सोयी सुविधांकडे लक्ष न देता गावातील लोकांच्या समस्या कडे दुर्लक्ष करून पूर्ण गाव संबंधित अधिकारी यांच्या विरोधात वेळप्रसंगी वेळोवेळी गटविकास अधिकारी पंचायत समिती कंधार ( महेश पाटील ) यांना वारंवार तक्रार करूनही कानाडोळा व वेळकाढूपणा करून ते पण जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत . भ्रष्टाचारावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा त्याना सपोट पाठिंबा दिसून येत आहे . ग्रामसेविका मॅडमची दोन वेळेस बदलीचे आदेश देण्यात आले होते . दि. १९ / ४/ २०२३ मध्ये , जा. क्र. ८६७ व त्यानंतर दि. ७ नोव्हेंबर २०२२ रोजी जा. क्रं. २९८२ दोन वेळेस बदली होऊन त्या गाव सोडायला तयार नव्हत्या. फेमिकॉल होऊन खुर्चीवर आज पर्येत चिटकवून राहिल्या . येथे येणाऱ्या दुसऱ्या ग्रामसेवकाला धमकावत आहेत. उस्माननगर येथे कोट्यवधींचा निधी हाडपून त्यांचे गुत्तेदार पती देव यांनी विविध ठिकाणी ( लोणावळा , नांदेड व इतर ठिकाणी ) प्लाट ,घर , व इत्यादी संपत्ती भ्रष्टाचाराच्या रक्कमेतून घेतले आहेत . दोघांच्याही बॅंक खात्यातील काऊट निहाय चौकशी करून तात्काळ निलंबित करण्यात यावे , अन्यथा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल . सात दिवसांत कार्यवाही झाली नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा शेकापचे जिल्हा अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते बालाजी ईसादकर यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# सचिन खंडारे यांना महाराष्ट्र रत्न राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

## भुसावळ येथे होणार पुरस्कार वितरण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बुलढाणा । ज्ञानेश्वर बुधवत



सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा जवळील शिंदी येथील पत्रकार सचिन मधुकर खंडारे यांना जळगाव खान्देश जिल्ह्यातील भुसावळ येथील अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्था भुसावळ यांचा मानाचा उत्कृष्ट पत्रकारिता व सामाजिक कार्यकर्ता महाराष्ट्र रत्न राष्ट्रीय पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला आहे,सदर अनुश्री महिला बहुउद्देशीय संस्थेच्या अध्यक्ष सौ जयश्रीताई इंगळे यांनी सदर पुरस्कार जाहीर झाल्याचे पत्र दिनांक २९ सप्टेंबर रोजी दिले आहे,त्यामुळे एका वर्षामध्ये पत्रकार सचिन खंडारे यांना मिळालेला हा दुसरा पुरस्कार आहे,सचिन खंडारे हे गेल्या बारा वर्षापासून पत्रकारिता क्षेत्रांमध्ये उत्कृष्टरित्या काम करीत आहे,शेती,विद्यार्थी, पालक,गाव पातळीवरील रस्त्याच्या समस्या पिण्याच्या पाण्याच्या समस्या नागरिकांच्या समस्या तहसील दवाखाना यांच्या समस्या त्या सर्व समस्या आपल्या लेखणीच्या माध्यमातून सचिन खंडारे सातत्याने मांडत असतं, त्यामुळे अनेकांचा रोष सुद्धा त्यांनी पत्करला आहे ,या सर्वांची तमा बळकता त्यांचे लेखणीचे काम सुरूच आहे,लेखणी बरोबरच सामाजिक क्षेत्रामध्ये सुद्धा काम करत असतात यामध्ये रक्षाबंधनाच्या सणाच्या दिवशी तालुक्यातील जनुना तांडा येथे वंचित दीनदुबळ्या महिलांना दरवर्षी ते पन्नास साड्याचे वाटप करत असतात .दिवाळीला गरिबांना किराणा किट वाटप करत असतात,रक्तदान शिबिरे,विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्यांना पुरस्कार अनेक सामाजिक कार्यक्रम ते घेत असतात, आणि याच कार्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्ररत्न राष्ट्रीय पुरस्कार घोषित झाला आहे, नोव्हेंबर मध्ये सदर भुसावळ येथील शानदार कार्यक्रमांमध्ये अनेक दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सदर पुरस्कार प्रदान केला जाणार आहे,त्यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व जिल्हाभरातून त्यांच्यावर कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सरस्वती बंडु बनसुडे यांचे दु:खद निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले



कै.सौ. सरस्वती बंडु बनसुडे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दु:खत निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगी,सुन, तीन नातवंडे असा परिवार आहे पत्रकार व वृत्तपत्र विक्रेते माधव बनसुडे यांच्या चुलती होत्या. त्यांचा दशक्रिया विधी मंगळवार दिनांक ८/१०/२०२४ रोजी सरस्वती नदी तिरी सिद्धेश्वर मंदिर श्रीगोंदा येथे होणार आहे.

## चारोळी

आरोग्य जपावं
तीच यशाची खरी गुरुकिल्ली
तेच सांभाळता नाही आले तर
उडवतील तुमची जागोजागी खिल्ली.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# उपसरपंचांच्या धाडसामुळे वाघाळे येथे बिबट्या जेरबंद



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

रांजणगाव गणपती । प्रतिनिधी

आज रविवार दिनांक २९/०९/२०२४ रोजी पहाटे चारच्या सुमारास बिबट्या वाघाळे गावचे उपसरपंच श्री दादासाहेब सोनवणे यांच्या कोंबड्याच्या खुराड्यात शिरला होता. श्री दादासाहेब सोनवणे यांना कोंबड्यांचा आवाज आल्याने जाग आली व जाळीमध्ये बिबट्या असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी प्रसंगावधान राखून सीताफिने खुराड्याचा दरवाजा बंद केला व वन कर्मचारी श्री हनुमंत कारकूड यांच्याशी फोनवर संपर्क केला.

हनुमंत कारकूड यांनी वरिष्ठ कार्यालयाशी संपर्क साधून रेस्क्यू टीम बोलावली.वन परीक्षेत्र अधिकारी प्रताप जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल म्हेत्रे साहेब, वन कर्मचारी हनुमंत कारकूड, रेस्क्यू टीमचे जयेश टेमकर, ऋषिकेश विधाटे, शुभम शिस्तार, सुदर्शन खराडे, सचिन गोडसे यांनी मोठया सीताफिने पिंजऱ्यात बिबट्यास जेरबंद केले.

बिबट्याने सोळा कोंबड्यांचा फडशा पाडला. सरपंचांनी केलेल्या धाडसाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

दादासाहेब सोनवणे यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी अशी मागणी श्री सूर्यकांत बढे मा चेअरमन, नितीन भोसले बबनराव भोसले, दिलीप थोरात,एकनाथ डफळ यांनी केली.

# सर्वसामान्यांची सेवा करण्यातच पुण्य मिळते–सौ.आशाताई शिंदे यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड



लोहा कंधार मतदार संघातील तळागाळातील सर्वसामान्य गोरगरीब नागरिकांचे मनापासून सेवा केल्यास पुण्य मिळते असे प्रतिपादन कंधार लोहा विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या सौभाग्यवती तथा शेतकरी कामगार पक्षाच्या महिला प्रदेश उपाध्यक्ष सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे यांनी केले.

उस्माननगर तालुका कंधार येथे दिनांक २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी शेतकरी कामगार पक्षाच्या जिल्हाध्यक्ष बालाजी ईसादकर , राहुल सोनसळे कैलास नाईकवाडे , शिवा इसादकर , पोटजळे यांच्यासह शेकापाच्या कार्यकर्त्यांनी नोंदणीकृत महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगारांना भांड्यांच्या किटचे वाटप सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई शिंदे ह्या होत्या. तर प्रमुख पाहुणे म्हणून याप्रसंगी बालाजी ईसादकर ( शेकापा जिल्हा अध्यक्ष ) , सिद्धू पाटील वडजे , बालाजी हिलाल , महादेव पाटील घोरबांड कलंबर , सुधाकर सातपुते , फैयाज शेख , एजाज भोसीकर , विशाल कौशल्य , आधी कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांचा यथोचित उस्माननगर च्या वतीने सत्कार करण्यात आला . यावेळी सामाजिक कार्यकर्त्या सो आशाताई शिंदे यांनी शासनाच्या विविध योजना या गोरगरिबांच्या कल्याणासाठी बनवले आहेत त्यांचा सर्व स्तरातील जनतेने लाभ घ्यावा. बांधकाम कामगारांना कीडचे वाटप करून चांगला उपक्रम राबविल्याबद्दल संयोजकाचे अभिनंदन यावेळी करण्यात आले. त्यानंतर उपस्थित निराधार , श्रावणबाळ , विधवा , वयोवृध्द महिला मंडळाची आडी अडचणीच्या शंका दूर करून समाधानकारक प्रश्नाचे उत्तरे देऊन त्यांनी कोणाच्याही मागे न लागता मला कामे सांगा मी पूर्ण करण्याचा प्रयत्न करेन. गोरगरिबा च्या लोकांची सेवा करण्यातच पुण्य मिळते असे भावनिक उदगार काढले. यावेळी महाराष्ट्र इमारत बांधकाम नोंदणीकृत बांधकामगारांना भांड्याच्या किटचे वाटप करण्यात आले.




**अमरनाथ यात्री संघाचे अध्यक्ष धर्मभूषण ॲड.दिलीप ठाकूर यांच्या सिद्धहस्त लेखन शैलीतून रोमांचकारी असणारा अंदमान टूर चा रोज चा वृत्तांत याच ठिकाणी दररोज प्रसिद्ध करण्यात येणार आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा ही विनंती. – संपादक**

(भाग ४)

सकाळी नाश्त्याचे पार्सल सोबत घेऊन आम्ही ईस्टर्न गेट हॉटेल सोडले. एसी टेम्पो ट्रॅव्हल्स ने पंधरा मिनिटात जेटी वर पोहोचलो. आजचा आमचा प्रवास क्रुझने होणार होता. विमानतळाप्रमाणे या ठिकाणी सर्व तपासणी होते. मॅक्रो क्रूज मध्ये आमच्या सीट रिझर्व केलेल्या होत्या. क्रूझ चा अनुभव बहुतेक जण पहिल्यांदाच घेत होते. प्रशस्त अशा क्रुझ वर एसीमध्ये तीनशेच्या आसपास आरामदायी सीटवर बसण्याची व्यवस्था केलेली होती.अथांग समुद्रात प्रवास करताना अतिशय उत्साही वातावरण निर्माण झाले होते. सेल्फी,ग्रुप फोटोला उधाण आले होते. दीड तासाचा प्रवास करून आम्ही हॅवलॉक बेटावर पोहोचलो. गुलामगिरीची प्रतीके हटवण्याच्या उद्देशाने मोदी सरकारने अंदमान निकोबार बेटावरील अनेक बेटांचे नामकरण नव्याने केले असल्यामुळे हॅवलॉक बेटा ला स्वराज द्वीप असे ओळखले जाते.

स्वराज दीप ला उतरल्यानंतर आमचे सामान डायरेक्ट हॉटेलला पोहोचण्याची व्यवस्था केली होती. आम्ही मात्र एक जोडी कपडे घेऊन एसी टेम्पो ट्रॅव्हल्स ने सात किलोमीटर अंतरावर असलेल्या राधानगर बीच कडे निघालो.हॅवलॉक बेट आणि संपूर्ण अंदमान आणि निकोबार बेटांमधील सर्वात प्रसिद्ध ठिकाणांपैकी एक म्हणजे राधानगर बीच. ज्याला बीच क्रमांक ७ म्हणूनही संबोधले जाते, २००४ मध्ये टाइम मॅगझिनने आशियातील सर्वात मोठा समुद्रकिनारा आणि जगातील सातवा सर्वोत्तम समुद्रकिनारा म्हणून निवडले होते. २०१६ मध्ये ट्रिप डव्हायझर्स ट्रॅव्हलर्स चॉईस अवॉर्ड्सद्वारे देखील या बीचची यादी टॉप २५ पैकी एक म्हणून करण्यात आलेली आहे. समुद्रकिनाऱ्यावर उन्हापासून संरक्षण व्हावे म्हणून तयार केलेल्या असंख्य झोपड्या, बेंच आणि खुर्च्या वर आमचे सामान ठेवले. हा संपूर्ण परिसर उंच झाडांनी नटलेला असल्यामुळे आराम करण्यासाठी अतिशय उत्तम ठिकाण आहे.नीलमणी निळे पाणी आणि वाळूचे पांढरे दाणे असलेले विशाल किनारे दोन किलोमीटर पसरलेले होते. ते पाहताना अंदमान आणि निकोबार बेटांचे राधानगर बीचला प्रमुख आकर्षण का म्हटले जाते याची प्रचिती येते.हे बीच शांतता आणि सौंदर्यासाठी एक हॉप, स्किप आणि जंप असल्याने ते विदेशी पर्यटकांच्या पसंतीस उतरले आहे.समुद्राचे निळे पाणी शांत आणि आमंत्रण देणारे होते. बचावासाठी सज्ज असलेल्या गस्त घालणाऱ्या जीवरक्षकांसह समुद्रकिनाराही सुरक्षित वाटत होता. वनविभागाच्या काळजीपूर्वक देखरेखीमुळे आणि प्रदेशात वारंवार मगरीचे दर्शन न झाल्यामुळे समुद्रकिनारा केवळ सुंदरच नाही तर पोहण्यासाठीही सुरक्षित आहे.पाण्यात कोणतेही कोरल किंवा खडक नव्हते.त्यामुळे ज्यांनी पाण्यात न उतरता किनाऱ्यावर बसून रहायचे असा विचार केलेला होता. तो बदलून पाण्यात डुबक्या मारल्या.इथे लाटा मध्यम आकाराच्या आहेत. याव्यतिरिक्त समुद्राची खोली पुरेशी आहे.ज्यामुळे बिंदासपणे सर्वजण पाण्यात खेळत होते. काहीजण पोहण्याचा आनंद लुटत होते. मला नाही वाटत की, समुद्र स्नानाचा आनंद घेण्यासाठी राधानगर इतके सुंदर बीच दुसरे कोणते नसेल. समुद्रकिनाऱ्याजवळ असलेले जीव रक्षक डोळ्यात तेल घालून पाहणी करत होते. कोणी दहा मीटर च्या आत पोहण्यासाठी गेले तर लगेच शिट्टी वाजवून धोक्याची सूचना देत होते. १० मीटरच्या पलीकडे पाण्याचे प्रवाह आणि लाटा किंचित खवळतात त्यामुळे ही दक्षता घेणे आवश्यकच आहे. मनसोक्त पोहून व लाटांवर उड्या मारल्यानंतर आम्ही समुद्राच्या बाहेर आलो. या बेटाला लागूनच एलिफंट समुद्रकिनारा आहे.तिथे माहूत पर्यटकांना जॉयराईडसाठी हत्ती वर घेऊन जातात. जर तुम्ही जगातील कोणत्याही समुद्रकिना–यावर हत्तीची सफर अनुभवली नसेल, तर तुम्ही नक्कीच हा प्रयोग इथे करून पहा. राधानगर बीच सूर्यास्ताचा आनंद घेण्यासाठी सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक आहे.

दुपारी एक वाजता आम्ही पोहोचलो हॅव लॉक आयलँड बीच या रिसॉर्टवर. आमच्या मुक्कामाची येथील व्यवस्था पाहून सर्व जण चकितच झाले.लाकडी झोपडी–शैलीचे रेस्टॉरंट आहे.समुद्रकिनाऱ्यावर दोन एकर पेक्षा जास्त जागेत हे बांधलेले आहे. स्वतंत्र प्रशस्त रूम मध्ये सर्व सुविधा उपलब्ध आहेत. अतिशय उत्तम पद्धतीच्या दुपारचच्या जेवणाचा आस्वाद सर्वांनी घेतला. या ठिकाणी सीफूड आणि शाकाहारी पदार्थ थोडे तेलकट असले तरी दर्जेदार व चविष्ट होते.

संध्याकाळी चारच्या सुमारास आम्ही काला पत्थर या बीच ला भेट दिली.एका बाजूला अथांग समुद्र आणि दुसरीकडे हिरवेगार पर्जन्यवन अशा विस्मयाच्या जगात पूर्णपणे हरवून गेलो .समुद्रकिनाऱ्याच्या बाजूने नयनरम्य वातावरणात तीन किलोमीटर चाललो. निसर्गाच्या वैभवात चिरस्थायी आठवणींना उजाळा देण्याची ही अद्भुत संधी या सी वॉक मुळे मिळाली. चहा पिण्यासाठी एका टपरीवजा हॉटेलवर आम्ही थांबलो होतो. चहावाला चहा बनवताना गुणगुणत होता. त्याचा आवाज ऐकून संदीप मैंद यांनी आपल्या जवळचा कोराओके आणून दिला. अतिशय जबरदस्त आवाजात गणेश ने कुमार सानू ची एक दोन गाणे म्हटली. ती ऐकून मी बीचवर सर्वांना एकत्रित करून सांगितले की, अंदमान बेटावरील ज्युनिअर कुमार सानू हा आपल्यासाठी गाणे गाणार आहे. आमची मैफिल सुरू झाली आणि बघता बघता इतर पर्यटक देखील आमच्या सोबत सामील झाले. काहींनी अतिशय सुंदर डान्स या ठिकाणी केला. वेळेअभावी ही मैफिल अधुरी सोडावी लागली.

संध्याकाळी रिसॉर्टवर पोहोचल्यानंतर वातावरण एकदम अद्भुत होते. उंच उंच नारळाच्या झाडांना लावलेली रंगीबेरंगी लाइटिंग मनमोहक होती. दिलच्या आकारात सजवलेल्या बेंचवर अनेकांनी कपल फोटो काढले. या ठिकाणी स्विमिंग पूल ची व्यवस्था असल्यामुळे काहींनी पोहण्याचा आपला शौक पूर्ण केला. समुद्रकिनारावर असलेल्या झोपाळ्यावर बसून समुद्राचे शांत रूप पाहण्याचा आनंद आम्ही लुटला. रात्री सात वाजता अद्यावत डीजे वाजणे सुरू झाले. मग काय सर्वांचे पाय तिकडे वळले. वय विसरून सर्वजण मनसोक्त नाचले. ढोल बाजे ढोली ना या गरबा गाण्यापासून सुरू झालेली ही डान्स ची मैफिल अभी तो पार्टी शुरू हुई है या युगल गीतापर्यंत कधी पोहोचली हे समजले देखील नाही. दिवसभर पोहणे व डान्सचा भरपूर आनंद घेतल्यामुळे चविष्ट भोजनानंतर प्रशस्त बेडवर पडल्यानंतर निद्रा देवीच्या कुशीत लगेच विसावलो. (क्रमशः)

# इंदापूर मध्ये ज्याच्यात निवडून येण्याची क्षमता तोच उमेदवार देणार–शरद पवार

## इंदापूर मधील इच्छुक उमेदवारांसह शेडो कार्यकर्ते पवारांच्या गोविंद बागेत





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बारामती | बबनराव धायतोंडे**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूर तालुक्यातील इच्छुक उमेदवार आणि शेकडो कार्यकर्ते दि.२९ रोजी गोविंद बागेत बारामती येथे आले होते.त्यांनी शरद पवार यांना विनंती केली की पक्षातीलच उमेदवार इंदापूर विधानसभेला द्या.

आयात उमेदवार नको,अशी मागणी शेकडो कार्यकर्त्यांसह सोनाई परिवाराचे सर्वेसर्वा दशरथ माने,पीडीसीसी बँकेचे संचालक आपासाहेब जगदाळे,सोनाई परिवाराचे संचालक प्रविण माने,अमोल भिसे,तालुका अध्यक्ष तेजसिंह पाटील,तालुका कार्याध्यक्ष महारुद्र पाटील,महिला अध्यक्षा छायाताई पडळकर,बाबा मिसाळ,अमोल मुळे इत्यादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी शरद पवार म्हणाले की इंदापूर तालुक्यातील विधानसभेच्या बाबतीत उमेदवारांचा सर्वे केला जाईल आणि ज्या उमेदवारांच्या बाजूने सर्वे येईल त्याच उमेदवाराला उमेदवारी दिली जाईल.आणि काहीही करून आपल्याला राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणायचे आहे,त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांनी मतभेद विसरून एक दिलाने एकमताने काम करा असे पवार साहेबांनी कार्यकर्त्यांना सूचना दिल्या.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे इंदापूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बिबट्याच्या हालचाली टिपण्यासाठी लिंबोडी येथे बसविला ट्रॅप कॅमेरा







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

गेल्या आठवड्यापासून आष्टी तालुक्यातील लिंबोडी येथे बिबट्याने काही शेळ्यांची शिकार केली या परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. याबाबत वनविभागाच्या टिमने तत्परतेने दखल घेत या परिसराला भेट दिली शेतकऱ्यांशी संवाद साधला. वनपरिक्षेत्र अधिकारी ढगे यांच्या आदेशानुसार वनविभागाची टीम तेथे तात्काळ आली त्यांनी ज्या ठिकाणी बिबट्याचे वास्तव आहे त्या ठिकाणी ट्रॅप कॅमेरा बसवण्यात आले त्यावेळी वनपाल मोहोळकर,वनरक्षक विधाते मॅडम,काळे,आरगाडे पंदलवाड, शिंदे तसेच वनमजूर कानिफ पवार,शकील शेख,अशोक पाथरकर उपस्थित होते तसेच शेतकर्यांनी आपल्या शेतीची कामे करत असताना आपली चाहूल प्राण्याला लागेल असे मोबाईलची गाणी मोठ्या आवाजात लावावित. रात्रीची शेतकामे करताना सोबत काठी, आणि टॉर्च बाळगावी,आपल्या शेतीची कामे करत असताना शेतकऱ्यांनी सावधान रहावे तसेच पुरेसे खाद्य व राहण्या-योग्य वातावरण मिळाले,तर बिबट्या गावाजवळ राहू शकतो.पाळीव कुत्रे,बकऱ्या व डुकरे बिबट्याला वस्तीकडे आकर्षित करतात.स्वतःचे नुकसान कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या गुरांना बंदिस्त गोठ्यामध्ये ठेवावे.गावाजवळ बिबट्याचा वावर कमी करण्यासाठी लोकांनी गाव स्वच्छ ठेवले तसेच कचऱ्यामुळे येणाऱ्या मोकाट कुत्रे व डुकरांची संख्या कमी होईल त्यामुळे गावाजवळ बिबट्याचा वावर कमी होईल असे वनरक्षक श्रीमती विधाते यांनी सांगितले.

# खुंटेफळ तलावा साठी आणखी चार टीएमसी तर पाटोदा शिरूरसाठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार–धस

## कार्यकर्त्यांच्या बैठकीत सुरेश धस यांना आमदार करण्याचा निर्धार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

सिना मेहकरी उपसा सिंचन खुंटेफळ साठवण तलाव असेल या योजना आणि या योजनेचे मी काम केले आहे.मात्र काहींनी बटन दाबण्याचे काम केलं आणि श्रेय घेण्याचं काम केलं सीना मेहकरी उपसा सिचन योजनेचे काम मी ९७% असून खुंटेफळ साठवण तलावा मध्ये १.६८ टीएमसी पाणी येणार आहे मात्र एवढ्यावर समाधान होणार नसून आणखी चार टीएमसी पाणी आणेपर्यंत पर्यंत मी शांत बसणार नाही तसेच पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार असल्याचे आमदार सुरेश धस यांनी प्रतिपादन केले आहे.

आष्टी येथील लक्ष्मी लॉन्स येथील कार्यकर्त्यांच्या निर्धार बैठकीत ते बोलत होते. पुढे बोलताना माजी राज्यमंत्री सुरेश धस म्हणाले की,सध्या विधानसभा निवडणुकीच्या हालचाली सुरू झाल्या असून आष्टीतील आजी माजी आमदारांनी मतदारसंघात दौरे सुरू केले आहेत मात्र यांनी गेल्या दहा वर्षांमध्ये विकासाचे काय दिवे लावले ? गेल्या दहा वर्षांमध्ये आष्टी तालुक्यामध्ये किती शाळा खोल्या बांधल्या? अनेक ठिकाणी शिक्षकांची रिक्त पदे आहेत. तसेच संजय गांधी निराधार योजनेच्या बैठका किती दिवसापासून घेतल्या नाहीत ? याचे उत्तर देण्याचे आव्हान माजी मंत्री सुरेश धस यांनी दिले... पुढे बोलताना म्हणाले की, गेल्या दहा वर्षापासून मी या मतदारसंघाचा आमदार नाही.तरीही लोकांना व कार्यकर्त्यांना अजून मीच आमदार असल्यासारखे वाटत आहे. आष्टी मध्ये सध्या आजी-माजी आमदारांनी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दौरे सुरू केले आहेत .मात्र या दौऱ्यामध्ये त्यांनी दहा वर्षांमध्ये काय विकास केला ? हे सांगावे. आष्टी तालुक्यामध्ये किती शाळा खोल्या मंजूर केल्या ?. संजय गांधी निराधार योजनेच्या किती महिन्यापासून बैठकाच नाहीत त्यामुळे अनेक लाभार्थी वंचित राहिले आहेत.अनेक ठिकाणी शिक्षक नसल्याने पालक वर्ग रस्त्यावर उतरला आहे. अशीच अवस्था तालुक्यातील अनेक शाळांची झालेली आहे अधिकाऱ्यावर नियंत्रण नसल्याने साध्या वारसाच्या नोंदी लावण्यासाठी शेतकऱ्यांकडून दहा-दहा हजार रुपये घेतले जात आहेत याचे उत्तर जनतेला मिळाले पाहिजे असे प्रतिपादन सुरेश धस यांनी केले. कोरोनाच्या काळामध्ये विरोधक घरामध्ये बसलेले असताना मी मात्र वर्षभर माझ्या घरापासून व माझ्या कुटुंबापासून दूर राहून लोकांना वाचविण्याचे काम केले. मच्छिंद्रनाथ देवस्थानच्या माध्यमातून तेरा ठिकाणी हॉस्पिटल तर ३३ ठिकाणी कोविड सेंटर उभारून लोकांना जीवदान देण्याचे काम केले. विरोधकांनी तर फक्त मोठं मोठ्या निबार शेवग्याच्या शेंगा वाटल्या. त्याही लोकांनी फेकून दिल्याची उपरोधिक टीका सुरेश धस यांनी केली. मी शेकडो रेमडिसिवर इंजेक्शन वाटले. मात्र फोटो कधीही काढला नाही. मात्र विरोधकांनी एक रेमडिसवर इंजेक्शन वाटून फोटोचा सिलसिला सुरू केला होता. माझी आई आजारी असताना सुद्धा मी वर्षभर लोकांमध्ये फिरून कोरोनाच्या रुग्णांना जीवदान देण्याचे काम केले. आष्टी मध्ये फक्त सिमेंट वाळू व पेव्हर ब्लॉगचा विकास



झाला असून तेही त्यांच्याच माध्यमातून झाल्याचा आरोप त्यांनी केला.मी सीनामेहकरी योजनेचे काम ९७% केले मात्र तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येऊन त्या योजनेचे बटन दाबले व भीमराव धोंडे या योजनेचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करीत असल्याची टीका नाव न घेता त्यांनी केली. या खुंटेफळ योजनेमध्ये १.६८ टीएमसी पाणी येणार आहे मात्र एवढ्यावर समाधान होणार नसून आणखी चार टीएमसी पाणी आणेपर्यंत पर्यंत मी शांत बसणार नाही तसेच पाटोदा व शिरूर तालुक्यासाठी जायकवाडीतून पाणी आणून मतदारसंघ सुजलाम सुफलाम करणार असल्याचे आ.धस यांनी सांगितले.सन २०१२ साली मी मंत्री असताना फळबाग योजनेसाठी जो जीआर काढला त्या योजनेचे फायदे आत्ता शेतकऱ्यांना मिळत असून फळबागामुळे तालुक्यातील बहुसंख्य शेतकरी आता सुखी झाला आहे मी मतदार संघात जे काम केले त्याचे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांना फायदे झालेले आहेत .जे काही कमावलेला आहे ते अत्यंत जुजबी आहे मी जे कमवले ती माझी ही प्रेमाची माणस आहेत आणि तीच माझी खरी संपत्ती आहे. लोकांच्या सुखदुःखात जावं लागतं लोकांच्या अडी अडचणी सोडाव्या लागतात लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडावे लागते त्याशिवाय जनमानसात स्थान मिळत नसतं.माझं कुटुंब हे सर्व लोकांच्या सुखदुःखात २४ तास असतं मतदारसंघात कुठेही काही घटना घडली तर ती माझ्या सर्वप्रथम कुटुंब यांना कळते यातच सगळं आलं. आज अनेकांचे इच्छुकांचे भावींचे गावभेट दौरे सुरू आहेत आणि त्यांच्या दौऱ्याला प्रतिसाद भेटत नाही म्हणून संस्थाचालकांनी आपल्या मास्तरांच्या गाड्या लावल्यात तर काहींनी मतदारसंघातली पुढारी गोळा केलेत आणि ते दौऱ्यात सामील करून घेतलेत मला मात्र ही गोष्ट करायची कधीच आवश्यकता पडली नाही. कारण जिथे जाईल तिथे माझ्या अवतीभवती माणसा जमा होतात हीच माझी खरी संपत्ती आहे. कायम सर्व सामान्यांच्या प्रश्नांची योग्य मांडणी विधानसभेत वेळोवेळी केली कारण ज्याला ग्रामीण भागातली जाण असते आणि जो त्यांचे प्रश्न खंबीर नेत्या मांडतो त्याच्याकडेच नेतृत्व दिले जातात आणि म्हणूनच मला विश्वास आहे ही माझी जनता मला कधीही वाऱ्यावर सोडणार नाही खंबीरपणे माझ्या पाठीशी उभी राहणार आहे त्यामुळे आगामी विधानसभेच्या निवडणुकीत कितीही समोर येऊन द्या त्यांना एकटा बास. सिना मेहकरी उपसा सिंचन खुंटेफळ साठवण तलाव असेल या योजना आणि या योजनेचे मी काम केले आहे.मात्र काहींनी बटन दाबण्याचे काम केलं आणि श्रेय घेण्याचं काम केलं परंतु ज्या वेळेस या योजना राबवायच्या होत्या आणि मंजूर करून घ्यायच्या होत्या त्यावेळेस मात्र याच लोकांनी विरोध केला होता ही योजना कशी खोटी आहे हे सांगायचा प्रयत्न केला होता.परंतु ज्या वेळेस हे सत्यात उतरत आहे त्यावेळेस लोकांना कळून चुकला आहे की खरं कोण आणि खोटे कोण हे जनतेच्या लक्षात आले आहे.यावेळी आष्टी, पाटोदा,शिरूर मतदार संघातील प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर या बैठकीचे नियोजन असताना सभेत झाल्याचे चित्र कार्यकर्त्यांच्या उत्साहपूर्ण उपस्थित वातावरणातून दिसत होते.

# नरसी येथे जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरी असंख्य समाज बांधवाच्या उपस्तिथ निघाली भव्य मिरणुक

## मिरवणुकीत मुस्लिम बांधवाची लक्षणीय उपस्थीती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

इस्लामचे धर्माचे प्रेषित हजरत मोहंमद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त नायगाव येथे ईद-ए-मिलादुन्नबी च्या अनुषंगाने जुलूस ए मोहम्मदी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी जुलूसमध्ये लहान मुले,मुली व परिसरातील मुस्लिम समाज बांधव समाजबांधव मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते.

दरवर्षी प्रमाणे यंदाही इस्लाम धर्मांचे अंतिम प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त दि.२९ सप्टेंबर २०४२ रोजी नरसी येथे ईद-ए-मिलादुन्नबी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली नारे तकबीर,अल्हाह हू अकबर च्या जयघोषाने नरसी



दुमदुमली जागोजागी सरबत,फळे,चॉकलेट,बिस्किट व पाणी बॉटल वाटप करण्यात आले सकळी ८:०० वाजताच दारुउलूम अहले सुन्नत नुरीया मुखेड रोड महेबुब नगर येथून जुलूस ए मोहम्मदीला प्रारंभ झाले त्यानंतर मुखेड रोड या मार्गाने मुख्य चौक होत नांदेड हैदराबाद मार्ग करत बसस्थानक परिसर,बिलोली रोड मार्गावरून मगदूमनगर येथील मस्जिद येथे पोहचला त्यानंतर फातेहखानी सलाम व दुवा झाल्यानंतर त्याच मार्गाने जुने गाव नरसी येथील हजरत खाकीशहावल्ली यांच्या दर्गाह येथे जाऊन फतेहखानी सलाम व दुवा झाल्यानंतर कार्यक्रमाची सांगता झाली सदर जुलूस यशस्वी करण्यासाठी जुलूस कमेटीचे अध्यक्ष - अलीम नाजीरसाब,उपाध्यक्ष माजीद शेख, जावेद खुरेशी, मोहद्दिन शेख, रफिक पठाण, पत्रकार अहेमद शेख, रफिक पटेल, एजास रजा, शाहेद नजीरसाब,शफी मनियार, आरिफ बागवान, सलीम शेख, सरफराज खान, इम्रान पठाण,अझर शेख,अन्सार शेख,पुरखान शेख,असिफ जुली, रहीम शेख,कलीम शेख,परवेझ चाऊस,तोफिक शेख आदील बागवान,अझान खान,नवयुवक व मिलाद कमेटीचे सर्व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले .

**एमआयएमचे नेते सय्यद मोईन हे आपल्या समर्थकासह नरसी येथील जुलूस मध्ये सहभागी झाले होत यामुळे नवयुवकामध्ये नवचैत्यन्य निर्माण झाले**

**माजी सभापती श्रावण पा.भिलवंडे, श्रीनीवास पा.चव्हाण,शिवराज पा.होटाळकर, प्रकाश पा.भिललंडे, भास्कर पा.भिलवंडे,रविंद्र पा.भिलवंडे, सरपंच गजानन भिलवंडे यांनी जुलूस ए मोहम्मदी मध्ये सहभागी होऊन मुस्लिम बांधवांना भरभरून शुभेच्छा दिल्या...**

# रावसाहेब दानवे यांच्या हस्ते जुई धरण फाटा दानापूर पिंपळगाव वालसावंगी फाटा रस्ते कामाचा शुभारंभ

## मतदार संघात रस्त्याचे जाळे निर्माण केले-आमदार संतोष पाटील दानवे





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

भोकरदन तालुक्यातील ७५३/ए राष्ट्रीय महामार्ग जुई धरण फाटा, दानापूर, पिंपळगाव रेणुकाई, पारध वालसावंगी फाटा, ३५ किलोमीटर १७८ कोटी रुपये किमतीच्या सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याचा शुभारंभ माजी केंद्रीय मा.ना. श्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आला याप्रसंगी भाजपा तालुका अध्यक्ष गणेश पाटील ठाले, राजेंद्र देशमुख, आशाताई पांडे, विजय कड, दानापूरचे सरपंच ग्रामपंचायत सदस्य गावातील प्रतिष्ठित नागरिक, व पंचक्रोशीतील सरपंच उपसरपंच पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बीड जिल्हा सलून व्यवसाय परिसंवाद मेळावा चे आयोजन

## सर्व सलून व्यवसायिकांनी उपस्थित राहावे-अक्षय जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सलून व्यवसायिकांना आधुनिक स्वरूपाचा व्यवसाय करण्यास कशा पद्धतीने सोपा जाईल यासाठी जन शिक्षण संस्थान अंतर्गत पीएम विश्वकर्मा प्रशिक्षण केंद्र आयोजित सलून व्यवसाय परिसंवाद मेळाव्याचे आयोजक महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांनी करून सलून व्यवसायिकांना नवनवीन कला कौशल्यांना उजाळा देऊन आधुनिक पद्धतीने व्यवसाय करण्यास सोपा




जावा याकरिता दिनांक १/१० /२०२४ वार मंगळवार रोजी जन शिक्षण संस्था चक्रधर नगर बीड या ठिकाणी ज्यांची नोंद आशिया बुक रेकॉर्ड मध्ये झालेली असे रेकॉर्ड होल्डर माननीय श्री संतोष सुरवसे यांचे प्रमुख मार्गदर्शन या मेळाव्यात लाभणार असून कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष गंगाधरजी देशमुख, प्रमुख उपस्थिती सुनील खंडागळे आविष्कार कोचिंग क्लासेस संचालक, श्री नितीन क्षीरसागर उपसंपादक दैनिक दिव्य लोकप्रभा, यांची उपस्थिती राहणार आहे.तरी बीड जिल्ह्यातील सर्व सलून व्यावसायिक व पार्लर व्यवसायिकांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे शहर अध्यक्ष अक्षय जाधव यांनी केले आहे.

# पुरस्कार म्हणजे जबाबदारी मध्ये वाढ शिक्षक आमदार प्रा.जयंत आसगांवकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव गणपती । प्रतिनिधी**

शिरूर तालुक्यातील शिक्षक म्हणजे उपक्रम व शैक्षणिक गुणवत्तेचे प्रमुख केंद्र आहे यामुळे रोटरी क्लबचा राष्ट्र निर्माता शिक्षक पुरस्कार प्राप्त करणे म्हणजे जबाबदारी मध्ये वाढ असल्याचे प्रतिपादन पुणे विभागाचे शिक्षक आमदार जयंत आसगावकर यांनी केले.

शैक्षणिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी रोटरी क्लब ऑफ शिक्रापूर यांच्या वतीने सन २०२४ साठीचे नेशन बिल्डर अवॉर्ड प्रदान करण्याच्या कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते . शिरूर तालुक्यातील विविध शाळांमधून प्राथमिक व माध्यमिक




विभागाचे एकूण २१ गुणवंत शिक्षक यासाठी निवडण्यात आल्याचे प्रतिपादन रोटरी क्लब ऑफ शिक्रापूरचे अध्यक्ष विठ्ठल वाघ व सचिव तुषार पाचुंदकर पाटील यांनी केले.

रांजणगाव गणपती येथे स्व.बाबुराव दौंडकर स्मारक समिती सभागृहामध्ये या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी पाठ्यपुस्तकातील कवी हनुमंत चांदगुडे,संस्थापक अध्यक्ष वीरधवल करंजे,असिस्टंट गव्हर्नर डॉ.मिलिंद भोसुरे इ. मान्यवर उपस्थित होते.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन म्हणून हा सन्मान सोहळा आयोजित केला असल्याचे प्रतिपादन संयोजक मनोहर परदेशी,राहुल चातुर यांनी सांगितले.याप्रसंगी महाराष्ट्र शासन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ विजेते सचिन बेंडभर यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पुरस्कार प्राप्त शिक्षक - गुरुदत्त पाचर्णे,गणपत बोत्रे,यशवंत बेंद्रे,महादेव पाटील, श्याम नाईक, विशाल कुंभार, अलका सातपुते, मनीषा साळुंखे, रमेश करपे, द`विदास कंठाळे, दीपक मोरे, सुनंदा राहुलकर, सुरेखा डोईफोडे,विलास पुंडे, बाबासाहेब शेरकर, दत्तात्रय वाळेकर, गोरक काळे, दीपक सरोदे,पोपट भालेराव,गोरख कोथिंबीरे, वाल्मीक फाळके.

# बीड-अहिल्यानगर रस्त्यावरील धामणगाव येथे विजय(आण्णा )गाढवेंच्या नेतृत्वात खड्ड्यांत झाड लावून आंदोलन



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

रस्त्यांची अवस्था बिकट झालेली आहे.याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष देत नसल्याने बीड - अहिल्यानगर रस्त्यावरील धामणगाव येथे युवा नेते विजय(आण्णा )गाढवे यांच्या नेतृत्वात खड्ड्यांत झाड लावून आंदोलन करण्यात आले.सार्वजनिक बांधकाम विभाग बेशरमझालाय काय? असा खडा सवाल धामणगाव येथिल तरुणांनी केला आहे. नुसता सवाल करून थांबले नाहीत तर त्यांनी खड्या चे पुजन करून झाड लावून सार्वजनिक बांधकाम विभागाचा निषेध केलाय.युवा नेते विजय( आण्णा) गाढवे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी विजय (आण्णा )गाढवे यांच्यासह तरुणांची उपस्थिती होती.

# मोनिका महिला नागरी पतसंस्थेची ८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**ओतूर । मयूर ढोबळे**

मोनिका महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित ओतूर ची ८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २९ रोजी सकाळी १० वाजता मोनिका हॉल , मोनिका चौक ओतूर येथे पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी तांबे व अध्यक्षा नीलिमा संभाजी तांबे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेच्या वेळी संस्थेच्या उपाध्यक्षा मोनिका आशीष शहा , सचिव ललिता सुभाष शेटे, सुरेखा संतोष फापाळे,अश्विनी संपत ढमाले, मंगल राजेंद्र खेत्री ,वैशाली संदीप बोचरे ,संगीता बन्सी काळे छाया तुला तांबे, वृषाली अजित डुंबरे ,रंजना सतीश डुंबरे, नीलम रघुनाथ पानसरे, रेश्मा विष्णू भले ,रोहिणी हेमंत बावबंदे,वैशाली प्रभाकर ठीकेकर उपस्थित होत्या. संस्थेचे सन मार्च २०२४अखेर अधिकृत भाग भांडवल १० कोटी असून, वसुल भाग भांडवल ४३ लाख १६ हजार आहे व संस्थेच्या ठेवी ४ कोटी ८४ लाख ८२हजार २५६ इतकी आहे. खेळते भांडवल ५ कोटी ४४ लाख आहे.संस्थेची गुंतवणूक




१ कोटी २१ लाख रुपये आहे कर्ज वाटप ३ कोटी २१ लाख रुपये आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संभाजी तांबे यांनी भाषणात बोलताना संस्थेच्या सभासद संख्या आणि आर्थिक स्थिती याबाबत माहिती दिली व येथून पुढच्या काळात जास्तीत जास्त महिला वर्गाने सभेस हजर राहावे असे त्यांनी सांगितले तसेच पुढील वर्षी दीपावली भेटवस्तू सभासद वर्गांना देण्याचे आश्वासन संस्थापक यांनी केले. सभेचे सूत्रसंचालन बाळासाहेब हरकूजी डुंबरे यांनी केले.सभेसाठी मांडवी किनारा पतसंस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप बोचरे व संस्थेचे सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.सभेची सांगता पसायदान घेऊन करण्यात आली.

# विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्था पाटोदाची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुका विद्युत कर्मचारी सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक-२९/०९/२०२४ रविवार रोजी विविध मान्यवराच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे अध्यक्ष सुनिल वाघमारे हे होते त्यांनी पतसंस्थेचा प्रगतीचा आलेख आपल्या अध्यक्षीय भाषणातून मांडला तसेच पतसंस्थेची दिर्घ कर्ज मर्यादा १२ लाखावरून १५ लाख करण्याची घोषणा केली. तसेच येणाऱ्या वर्षात पतसंस्थेचे सभागृह बांधकाम करण्याचा संकल्प केला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पी.बी.राख संस्थापक अध्यक्ष, सावकारे साहेब उपकार्यकारी अभियंता पाटोदा, प्रमोद राख साहेब उपकार्यकारी अभियंता, आर. व्ही. जाधव, आदेश कदम, सिकेतोड साहेब, चव्हाण साहेब, सचिन गायकवाड अध्यक्ष राष्ट्रवादी पतसंस्था बीड, संजय चव्हाण, सचिव साईनाथ राऊत, उपाध्यक्ष पंकज मिसाळ, गणेश जगताप आप्पा जानोळे, सौ. मिनाबाई



चव्हाण यांच्या सह इत्यादी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख पाहुणाच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी प्रमुख पाहुण्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, व संस्थेच्या कामा विषयी समाधान व्यक्त केले. सभा यशस्वी करण्यासाठी संचालक मंडळ सर्वश्री प्रभाकर येडे उपाध्यक्ष, सतीश गोरे खजिनदार, प्रभु जाधवर सचिव, शेख जाफर, विठ्ठल भाकरे, राजू पठाण, शहाजी नाईकवाडे, हनुमंत धुमाळ, रमेश बोबडे, दत्तात्रय भोंडवे, श्रीराम कुमरे, संदिपान अनपट, सौ.रेखा बांगर, सौ. दिप्ती गाडेकर, शेख मुजमील, तज्ञ संचालक तसेच व्यवस्थापक व्ही.टी. नाईकवाडे, शेख माजेद संगणक ऑपरेटर हे हजर होते. तसेच सर्वसाधारण सभेचे प्रस्ताविक संस्थेचे सचिव प्रभू जाधवर यांनी केले. व आभार प्रदर्शन प्रभाकर येडे उपाध्यक्ष यांनी मानले.

# आधुनिक शिक्षणाला महत्त्व द्यायला हव,त्यातूनच ग्रामीण विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलेल-शरदचंद्रजी पवार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा विचार महाराष्ट्रात पोहोचला आहे. गोरगरीब ,दुर्बल, आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी रयत शिक्षण संस्था काम करीत आहे. अनेक देणगीदारांनी सामाजिक बांधिलकी म्हणून देणगी दिली आहे. ग्वाल्हेरचे शिंदे घराणे यांचेही योगदान मोलाचे आहे. रयत शिक्षण संस्था ही काळाबरोबर बदलणारी संस्था आहे. आजचे युग हे डिजिटल युग आहे. या युगाप्रमाणेच शिक्षण द्यायला हवे. आधुनिकता शिक्षणात आणायला हवी. त्यातूनच ग्रामीण विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व फुलतील.







महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे योगदान फार मोलाचे आहे. समाजाच्या कल्याणासाठी या महापुरुषांनी खूप मोलाचे काम केले आहे. स्त्री शिक्षणाबरोबर शेतकरी कल्याणाचा विचार महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी त्या कालखंडात मांडला होता. शेतकऱ्याचे दुधाचे उत्पादन उत्पादन वाढले पाहिजे .संकरित वाण तयार केले तरच शेतकऱ्यांचे उत्पादन वाढेल व शेतकरी समृद्ध होईल असे विचार महात्मा फुले मांडत होते. राजर्षी शाहू महाराज हे सामाजिक बांधिलकी जोपासणारे राजे होते. आपल्या संस्थानाचा उपयोग त्यांनी दुर्बल घटकांना शिक्षण मिळावे, गोरगरीब, शेतकरी, दलित यांची प्रगती व्हावी यासाठी केला. शेतीमध्ये आधुनिकता यावी यासाठी त्यांनी धरणे बांधली. कर्मवीरांचा आदर्श महात्मा फुले व राजर्षी शाहू राजे होते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचारांचा वारसा चालवला.

पुढे मा. शरदरावजी पवार म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते नव्हते तर ते राष्ट्रपुरुष होते. त्यांनी राष्ट्राच्या उन्नतीसाठी कामे केली. भाक्रानांगल या धरणामुळे पंजाब हरियाणा या राज्यात ९४% क्षेत्र बागायत झाले. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी खेड्यापाड्यातील गोरगरिबांच्या झोपडीत ज्ञानगंगा गेली पाहिजे. शिक्षणाच्या माध्यमातून गोरगरिबांचे जीवन फुलवले .हाच विचार आजही रयत शिक्षण संस्था करीत आहे. आधुनिकता स्वीकारून पुढे जात आहे, असे विचार रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण खा. शरदचंद्रजी पवार यांनी मांडले. ते महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात बोलत होते. रयत शैक्षणिक संकुलाच्यावतीने आयोजित केलेल्या इमारत उद्घाटन व भूमिपूजन समारंभात उद्घाटक म्हणून ते बोलत होते.

रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन माजी सनदी अधिकारी चंद्रकांत दळवी अध्यक्षस्थानी होते ते म्हणाले की, भौतिक सुविधा वाढल्या तर गुणवत्ता वाढणारच. चक्ख -उएढ,नीट प्रवेश परीक्षेत घवघवीचे यश मिळवा. इंजिनिअर व्हा. डॉक्टर व्हा .इंटर ऍक्टिव्ह पॅनल प्रत्येक वर्गात बसले पाहिजेत. डिजिटल क्लासरूम झाले पाहिजेत असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

प्रास्ताविक व स्वागत रयत शिक्षण संस्था जनरल बॉडीचे सदस्य बाबासाहेब भोस यांनी केले. मोठ्या कष्टातून रयत शिक्षण संस्थेचे महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय उभे राहिले आहे. बबनराव पाचपुते, बाबासाहेब भोस, प्रकाशशेठ पटवा, बाबुमिया बँडवाले त्यांच्या प्रयत्नातून हे महाविद्यालय आज विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गरज भागवीत आहे

महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन, माजी मंत्री, आ. बबनराव पाचपुते यांनीही विचार व्यक्त केले.म्हणाले की, गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्याचे काम रयतेचे शिक्षक करीत आहे. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करा. असे ते म्हणाले. यावेळी एक मात्र नक्की जाणवतं होत की कार्यक्रमात सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांना कुठलंही स्थान मीळत नव्हते त्यांचा चेहर्यावर पष्ट नाराजी दिसत होती

या समारंभासाठी रयत शिक्षण संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी आ. राहुल जगताप, मीनाताई जगधने, राजेंद्र फाळके, रयत शिक्षण संस्थेचे सचिव, माजी सनदी अधिकारी, विकास देशमुख, कुंडलिकराव दरेकर, अण्णासाहेब शेलार, राजेंद्र नागवडे,साजन पाचपुते, शिवाजीराव पाचपुते, महावीर पटवा बाजीराव कोरडे ,सुभाषशेठ गांधी, राजेंद्र खेडकर,नवनाथ बोडखे, गीता चौधरी दिलीप भुजबळ, मिलिंद दरेकर ,संतोष दरेकर, सुभाष रामराव कोरडे विद्यार्थी, विद्यार्थिनी, शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा शहाजी मखरे, प्रा. शरद साळवे यांनी केले. आभार प्राचार्य डॉ.महादेव जरे यांनी मानले.

# तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाला पुर्वीचे वैभव प्राप्त करून देणार

## माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाला पुर्वीचे वैभव प्राप्त करून देणार असल्याचे प्रतिपादन नांदेड जिल्ह्याचे माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी सर्व सभासदाना ग्वाही दिली आहे. ते कंधार तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाच्या वार्षीक सर्वसाधारन सभेचे उद्घाटन त्यांच्या हास्ते करण्यात आले त्यावेळी ते बोलताना म्हणाले.

कंधार तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाची वार्षिक सभा दि.२८ सप्टेबर रोजी खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात घेण्यात आली.




या वार्षिक सभेच्या अध्यस्थानी कंधार तालुका शेतकरी खरेदी विक्री संघाचे सभापती प्राचार्य किशनराव डफडे होते, तर उद्घाटक म्हणून नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर होते.तर प्रमख पाहुने म्हणून बाबुराव केंद्रे उमरगेकर,दत्ता चंदनफूले, भगवान राठोड, संजय देशमुख, आण्णा साहेब कदम,दत्ता घोरबांड,राजू मुकनर नंदनशिवणीकर, कालीदास गंगावरे,अंगत केंद्रे,राजकुमार केकाटे यांच्यासह मोठ्या प्रमाणात खरेदी विक्री संघाचे पदाधिकारी व सभासद उपस्थित होते.

कंधार तालुका शेतकरी सहकारी खरेदी विक्री संघाचे सभापती प्राचार्य किशनराव डफडे यांनी वार्षिक अहवालाचे वाचन करुन दाखवले आणि खरेदी विक्री संघावर मध्येवर्ती बॅकेचे मोठ्या प्रमाणात कर्ज असल्याचे माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निदर्शनास आनुन दिले आहे.

आपल्या भाषणात पुढे बोलताना माजी खा. चिखलीकर म्हणाले की कंधार तालुका खरेदी विक्री संघ बंद पाडण्याचा घाट कोणी घातला त्याच्या खोलात मी जाणार नाही.परंतू मराठवाड्यात सगळ्यात चांगला संघ कोणता तर कंधारचा असे खरेदी विक्री संघाचे नाव लौकीक करण्यासाठी सगळ्यानी मिळून आपणाला भूमिका वटवायची आहे.या खरेदी विक्री संघाचे वैभव जे मागच्या काळात होत. शेतकर्यासाठी सगळ्या सुविधा मिळवून देणे कै. शंकरराव चव्हाण आणि कै. श्यामरावजी कदम यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून सगळ्या संस्था पुर्णजिवित करुन चांगल्या चालवून शेतकर्याना न्याय देणार असल्याचे शेवटी चिखलीकरांनी सांगीतले.यावेळी सर्व संचालक मंडळ, सर्व सहकारी सोसायटीचे चेअरमन बहूसंख्येनी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आर.के वरपडे यानी केले आहे. या कार्यक्रमास संघाचे व्यवस्थापक बी.आर बनसोडे, त्र्यंबकराव भोसीकर, श्यामसुंदर शिंदे मांजरमकर,साईनाथ कोळगीरे, आकाश मठपती, यांच्यासह मोठ्या प्रमाणात कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

# दीनदयाल विद्यालयाच्या देखाव्यांना प्रोत्साहन समितीकडून भरघोस बक्षीसे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देऊळगाव राजा । ज्ञानेश्वर बुधवत**

स्थानिक दीनदयाल विद्यालय,कनिष्ठ कला व विज्ञान महाविद्यालयात गणेश विसर्जन मिरवणूकीत सादर करण्यात आलेल्या विविध देखाव्यांना गणेशोत्सव प्रोत्साहन समिती दे.राजा यांच्या वतीने भरघोस बक्षिसे देण्यात आली.दि.१७ सप्टे.२०२४ रोजी पार पडलेल्या श्री गणेशोत्सव विसर्जन मिरवणूकीत इयत्ता ५ वी ते१२ वी च्या विद्यार्थ्यांकडून वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध आशयाचे एकूण २० देखावे सादर करण्यात आले होते. यादेखाव्यांमधे समाजप्रबोधनपर,चालू घडामोडी,भारतीय संस्कृती व परंपरा यांची ओळख करुण देणाऱ्या देखाव्यांचा समावेश करण्यात आला होता.या देखाव्यांचे परिक्षण व निरिक्षण श्री.गणेशोत्सव प्रोत्साहन समिती दे.राजा यांच्या कडून करण्यात आले.या समितीकडून सर्वोत्कृष्ट पाच देखाव्यांना पुढीलप्रमाणे बक्षीसे देण्यात आली प्रथम क्रमांक ' कावड यात्रा,नारी वंदन वर्ग ८ब,द्वितीय क्रमांक कृष्णलीला वर्ग ७ ब,तृतीय क्रमांक योग एक आदर्श जीवनशैली वर्ग- ९ ड,,चतुर्थ क्रमांक सायकल चालवा पर्यावरण वाचवा वर्ग ९ ब आणि स्त्री संरक्षण काळाची गरज या वर्ग ९ क च्या देखाव्यास पाचव्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. सदर देखाव्यांना समितीच्या वतीने प्रमाणपत्र व रोख पारितोषिके देवून गौरविण्यात आले तसेच उर्वरित देखाव्यांनाही प्रोत्साहनपर बक्षीसे देण्यात आली. शाळेच्या वतीने आकर्षक देखाव्याचे सादरीकरण केल्याने विद्यालयाचे प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर यांचा समिती कडून शाल सन्मानपत्र



देऊन सत्कार करण्यात आला.विशेष बाब म्हणजे याच दिवशी सल्लागार अँड श्री.घनश्यामजी भाला यांचा वाढदिवस असल्याने त्यांचा वाढदिवस साजरा करून विद्यालयाच्या वतीने त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

या प्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी दे.राजा श्री गणेश प्रोत्साहन समिती अध्यक्ष श्री.राजेशजी भुतडा, त्याचबरोबर प्रोत्साहन समितीचे,पत्रकार श्री.सूरज गुप्ता,राजेश इंगळे, मा.काशीफ कोटकर,प्रभाकर खांडेभराड,पत्रकार सौ.सुषमाताई राऊत,अँड.घनश्यामजी भाला,गोविंदराव झोरे,वसंतअप्पा खुळे,विनोद जैस्वाल,सन्मती जैन, संचित धन्नावत,शिप्रमंचे सदस्य श्री. बाबासाहेब मिनासे आदी उपस्थित होते तद्वतच महाविद्यालयाचे प्राचार्य श्री.एस.बी.गारडे सर,पर्यवेक्षक श्री.एस.एन.व्यास, विद्यालयातील श्री.गणेश उत्सव समितीचे प्रमुख श्री. पी.बी.ठाकूर सर सह प्रमुख प्रा. संदीप डोईफोडे यांच्यासह सर्व प्राध्यापक प्राध्यापिका,शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी उपस्थित होते.

# राष्ट्रीय जनता दल आहील्यानगर महिला रणरागिणींची कार्यकारिणी जाहीर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

आज राष्ट्रीय जनता दलाच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा हिना शेख यांनी महिलांना पदभार दिला यामध्ये प्रामुख्याने महिला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष पदी मीनाताई मोहिते यांची बिनविरोध निवड करण्यात आली तर कर्जत तालुका अध्यक्ष पदी अनिता कापसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली अनिता कापसे या कर्जत तालुक्यात महिला बचतगटांच्या माध्यमातून व होमलोन च्या माध्यमातून संपूर्ण तालुक्यात परिचीत आहेत त्यांना समाज सेवेची तळमळ असलेल्या महिला म्हणून ओळखले जाते त्यांच्या याचं कार्याची दखल घेऊन पक्षाने तालुका अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली आहे सौ कापसे यांची संपुर्ण कर्जत तालुक्यात सामाजिक कार्यात नेहमीच आघाडी असते त्यांच्या बरोबर सौ संचिता सुर्यवंशी यांची जिल्हा सचिव पदी तर मदिना शेख यांची तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली तर युवकांमध्ये बापुराव जाधव यांची जिल्हा सचिव पदी तर कर्जत तालुका अध्यक्ष पदी प्रशांत भगत यांची वर्णी लागली आहे सर्वच नवनिर्वाचित पदाधिकार्यांनी मजबूत संघटन करून सामान्य जनतेची सेवा करण्याचा निर्धार व्यक्त केला या वेळी राष्ट्रीय जनता दलाचे जिल्हा अध्यक्ष गंगाराम मचे प्रदेश महासचिव रफिक इनामदार तसेच ज्ञानदेव काळे सचीव सुभाष ढवळे सामाजिक कार्यकर्ते सुनीलजी खोरे साहेब आण्णा तनपुरे शंकर भगत विष्णू पवार विकास पवार मिरदास सुळ मोहन नामदेव सुपेकर दादासाहेब होगले दत्तात्रय निकम परशुराम शिर्के तसेच जेष्ठ मार्गदर्शक नवनाथ आबा तनपुरे यांच्या सह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# मला तुमचा आशीर्वाद द्या मी तुम्हाला आयुष्यभर विसरणार नाही-प्रविण माने

## सोनाई परिवार आयोजित खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रमाला महिलांची प्रचंड गर्दी




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

इंदापूर तालुक्यातील महिला वर्गासाठी प्रविण भैय्या माने मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला न्यु होम मिनिस्टर,खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम नुकताच पार पडला.इंदापूर शहरातील वाघ पॅलेस येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात संपूर्ण तालुक्यातील महिला वर्गाने आवर्जून उपस्थिती लावली होती.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेस पैठणी साडी भेट देण्यात आली होती तर प्रमुख बक्षिसांमध्ये प्रथम क्रमांकाच्या पारितोषिक साठी स्कुटी गाडी,द्वितीय पारितोषिक एल.इ.डी.टीव्ही, तिसऱ्या क्रमांकासाठी फ्रीज तर चौथ्या क्रमांकाला वॉशिंग मशीन आणि पाचवे पारितोषिक पिठाची चक्की हे देण्यात आले.

ज्यात शेटफळ हवेली येथील उर्मिला सूर्यकांत चव्हाण यांना प्रथम क्रमांक, सराफवाडीच्या साक्षी निलेश जाधव द्वितीय क्रमांक,जंक्शनच्या जयश्री सुभाष शिंदे तिसरा क्रमांक,गणेशवाडीच्या अश्विनी ज्ञानेश्वर साठे चौथा व इंदापूरच्या दिपाली अमोल चौधरी यांना पाचव्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले आहे.या कार्यक्रमाचा महिलांनी मनसोक्त आनंद घेतला,यावेळी महिलांना नाचण्याचा मोह आवरता आला नाही.यावेळी अनेक महिलांनी प्रविण माने यांचे कौतुक करून त्यांना विधानसभेच्या निवडणुकीसाठी आमदार म्हणून शुभेच्छा देखील दिल्या.

यावेळी अंदाजे उपस्थित असलेल्या आठ ते दहा हजार महिलांना प्रत्येकी एक पैठणी देण्यात आली त्यामुळे महिलांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता. तसेच प्रविण माने म्हणाले की मला तुमचा आशीर्वाद हवा आहे,मी तुमच्या सदैव पाठीशी उभा राहील,असे म्हणून त्यांनी विधानसभेच्या निवडणुकीची सादच महिलांना घातली.

कार्यक्रमावेळी सोनाई परिवाराचे सर्वेसर्वा दशरथ माने पिडीसीसी बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे,जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रविण माने,राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष तेजसींह पाटील,कार्याध्यक्ष महारुद्र पाटील,युवा कार्यकर्ते बाबा मिसाळ,महिला अध्यक्षा छायाताई पडसळकर यांच्यासह प्रविण माने यांचे सहकुटुंब या कार्यक्रमास उपस्थित होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904